## नि.दि.मु.क्र.६६/२०२२ मधील निशाणी क्र.४४ वरील आदेश

## (CNRNo.MHSI08-000503-2022)

०१. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ सदानंद शंकर सावंत यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.०९ हे दि.२२/०३/२०२२ रोजी मयत झाले आहेत. सबब, प्रस्तूत वादी यांनी प्रतिवादी क्र.०९ चे वारस अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी अर्जास हरकत नोंदविली आहे व अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रस्तूतचा दावा सरस-निरस राहरास्त मानाने तुटक वाटप होवुन त्याचा पृथ्क कब्जा मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र.०९ चे वारस हे प्रस्तूत दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. अर्जात नमूद कारण योग्य वाटते. सबब, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

### – आदेश –

०१. निशाणी क्र.४४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करावी

०३. वादी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी नियमाप्रमाणे दावा दुरूस्ती प्रत देखील दाखल करावी.

SHUBHAM GOVIND LATURIYA

Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.07.08 18:39:37 +0530

वैभववाडी.
दिनांकः ०८/०७/२०२६.

(शुभम जी. लटुरिया)
न्यायधिकारी ग्रामन्यायालय,
वैभववाडी